माहिती का अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

१३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय समोर, मुंबई-४०० ०३२.

**website : sic.maharashtra.gov.in**

**दूरध्वनी क्र.०२२-२२०४९१८४** **फॅक्स क्र.०२२-२२०४९३९०**


क्र.मुमाआ-२०२३/प्र.क्र.४६/०१ दि. ०६.०९.२०२३

प्रति,
उप सचिव,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

विषय : मा.राज्य मुख्य माहिती आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेश दि.१७.०८.२०२३ अन्वये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत कलम ४ ची प्रभावी अंमलबजावणीसाठी केंद्र शासनातर्फे वेळोवेळी देण्यात आलेल्या आदेशांच्या अनुषंगाने संनियंत्रण करणेबाबत दि.२८.०८.२०२३ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त

उपरोक्त विषयाबाबत मा.राज्य मुख्य माहिती आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार दिनांक २८/०८/२०२३ रोजी सकाळी ११.०० वा. राज्य माहिती आयोगाच्या इतर सर्व खंडपीठांचे मा.आयुक्त, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगरे, रायगड, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती, नागपूर व महासंचालक, यशदा, पुणे यांचे समवेत दृकश्राव्य माध्यमाद्वारे बैठक आयोजित करण्यात आली होती.

मा.राज्य मुख्य माहिती आयुक्त यांच्या मान्यतेने सदरहू बैठकीचे इतिवृत्ताची प्रत पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी आपणास पाठविण्यात येत आहे.

( सविता जावळे )
सचिव, राज्य माहिती आयोग, मुख्यालय


टपाल केंद्र, मंत्रालय,
सामान्य प्रशासन विभाग
क्र.:-
स्वाक्षरी:-
दिनांक:- ११/०९/२०२३

मा.राज्य मुख्य माहिती आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली मा.सर्वोच्य न्यायालयाचे आदेश दि.१७.०८.२०२३ अन्वये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत कलम ४ ची प्रभावी अंमलबजावणीसाठी केंद्र शासनातर्फे वेळोवेळी देण्यात आलेल्या आदेशांच्या अनुषंगाने संनियंत्रण करणेबाबत बैठक इतिवृत्त

**स्थळ :** मा.राज्य मुख्य माहिती आयुक्त यांचे दालन, मुंबई

**वार व दिनांक :** सोमवार, २८/०८/२०२३ **वेळ :** सकाळी ११.०० वा.

मा.राज्य मुख्य माहिती आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केलेल्या बैठकीस खालील नमूद केल्याप्रमाणे अधिकारी उपस्थित होते.

| क्र. | अधिकाऱ्यांचे नांव | पद |
|---|---|---|
| १. | मा.श्री.समिर सहाय (दृकश्राव्य माध्यमाद्वारे) | राज्य माहिती आयुक्त, पुणे, औरंगाबाद (अ.का.) |
| २. | मा.श्री.राहुल पांडे (दृकश्राव्य माध्यमाद्वारे) | राज्य माहिती आयुक्त, नागपूर, अमरावती (अ.का.) |
| ३. | मा.श्री.भूपेंद्र गुरव (दृकश्राव्य माध्यमाद्वारे) | राज्य माहिती आयुक्त, कोकण, नाशिक (अ.का.) |
| ४. | श्री.चोकलिंगम (दृकश्राव्य माध्यमाद्वारे) | महासंचालक, यशदा, पुणे |
| ५. | श्रीम.सविता जावळे | सचिव, राज्य मुख्य माहिती आयोग |
| ६. | श्री.श्याम चौरे | उप सचिव, बृहन्मुंबई माहिती आयोग |
| ७. | श्री.राजेंद्र भोसले | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर |
| ८. | श्री.योगेश म्हसे (दृकश्राव्य माध्यमाद्वारे) | जिल्हाधिकारी, रायगड |
| ९. | श्री.जलज शर्मा (दृकश्राव्य माध्यमाद्वारे) | जिल्हाधिकारी, नाशिक |
| १०. | श्री.रवी कोलगे (दृकश्राव्य माध्यमाद्वारे) | जिल्हाधिकारी, पुणे |
| ११. | श्री.आस्तिकुमार पांडेय (दृकश्राव्य माध्यमाद्वारे) | जिल्हाधिकारी, औरंगाबाद |
| १२. | श्री.सौरभ कटियार (दृकश्राव्य माध्यमाद्वारे) | जिल्हाधिकारी, अमरावती |
| १३. | डॉ.विपिन इटणकर (दृकश्राव्य माध्यमाद्वारे) | जिल्हाधिकारी, नागपूर |
| १४. | श्रीम.रोशनी पाटील-कदम | उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग |
| १५. | श्रीम.शिल्पा देशमुख | अवर सचिव, राज्य मुख्य माहिती आयोग, मुख्यालय |
| १६. | श्री.वत्सराज | अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग |

| चर्चा मुद्दे | करावयाची कार्यवाही |
|---|---|
| सामान्य प्रशासन विभागाकडून खालील मुद्यांबाबत मागदर्शक तत्वे निश्चित करण्यात यावीत. | |
| माहितीचा अधिकार अधिनियम कलम ४ (१) नुसार माहिती प्रसिध्दी : | माहितीचा अधिकार अधिनियम कलम ४ (१) नुसार माहिती प्रसिध्द करण्यासाठी जबाबदार अधिकारी निश्चित करुन सदर माहिती प्रसिध्द न झाल्यास प्रशासकीय कारवाईची कार्यवाही करणे. |
| माहितीचा अधिकार अधिनियम कलम ४ (१) नुसार १७ मुद्यांबाबत नेमकी कोणती माहिती प्रसिध्द करावी : | माहितीचा अधिकार अधिनियम कलम ४ (१) नुसार १७ मुद्यांबाबत नेमकी कोणती माहिती प्रसिध्द करावी याबाबत क्षेत्रीय कार्यालयातील अधिकाऱ्यांना निश्चित जाणीव नसते त्यामुळे सदर १७ मुद्यांसंदर्भात प्रत्येक मुद्याबाबत नेमकी कोणती माहिती प्रसिध्द करावी हे स्पष्ट करण्यासाठी विस्तृतपणे उदाहरणासहित मागदर्शक सूचना निर्गमित करण्यात याव्यात. |

| | |
|---|---|
| राज्य माहिती आयोगातील रिक्त पदे : | गट क व ड बाबत माहितीचा अधिकार अधिनियम कलम १५(४) प्रमाणे आयोगातील रिक्त पदे आयोग स्तरावर भरण्यात येतील. याबाबत शासन निर्णय निर्गमित करावा.<br>आयोगातील रिक्त पदांसाठी इच्छुकता मागविण्यात यावी. इच्छुकता प्राप्त न झाल्यास बदलीने अधिकारी/कर्मचारी प्राप्त करुन द्यावेत.<br>दि.२१.०६.२०२३ च्या शासन निर्णयामध्ये पदे निरसित केल्यामुळे आयोगाच्या कामकाजावर विपरित परिणाम होत आहे. आयोगाच्या कामाचा व्याप फार मोठा आहे. सबब. सदर शासन निर्णय रद्द करण्यात यावा.<br>मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दि.१७.०८.२०२३ च्या आदेशाच्या अनुषंगाने कलम ४ अंमलबजावणी संनियंत्रण करण्यासाठी मनुष्यबळ आवश्यक असल्यामुळे आयोगाच्या दि.०६.०६.२०२३ च्या पत्रान्वये पाठविण्यात आलेला अतिरिक्त आकृतीबंध मंजूर करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागातर्फे तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. |

मा.राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी या बैठकीमध्ये चर्चा केलेल्या मुद्यांच्या अंमलबजावणीबाबत पुन्हा एकदा बैठक घेण्यात येईल असे सांगितले.

बैठकीस उपस्थित अधिकारी व दृकश्राव्य माध्यमांद्वारे उपस्थित सर्व अधिकाऱ्यांचे आभार मानले व बैठक संपल्याचे घोषित केले.

----------

| | |
|---|---|
| माहितीचा अधिकार अधिनियम कलम ४ (१) नुसार माहिती कोठे प्रसिध्द करावी : | माहितीचा अधिकार अधिनियम कलम ४ (१). नुसार माहिती ऑनलाईन (वेबसाईट) प्रसिध्द करण्यासाठी उचित प्लॅटफॉर्म (वेबसाईट पोर्टल इ.) या संदर्भात संबंधित तांत्रिक यंत्रणांशी समन्वय साधून उचित निर्णय घेणे. तसेच प्रत्येक स्तरावरील माहिती (ग्राम, ब्लॉक, तालुका, जिल्हा, विभागीय राज्य) त्या त्या स्तरावर अपलोड केली जाईल किंवा वरिष्ठ स्तरावरुन अपलोड केली जाईल या संदर्भात प्रत्येक विभागाने उचित निर्णय घेवून त्याप्रमाणे सामान्य प्रशासन विभागाला कळविणे. उदा. ग्रामपंचायतची माहिती प्रत्यक्ष ग्रामपंचायतीद्वारे अपलोड करण्यात येईल किंवा पंचायत/गट/ब्लॉक स्तरावर अपलोड करण्यात येईल. |
| माहितीचा अधिकार अधिनियम कलम ४ (१) नुसार माहिती कशा प्रकारे प्रसारित करावी : | माहितीचा अधिकार अधिनियम कलम ४ (१) नुसार माहिती कशा प्रकारे प्रसारित करण्यात येईल उदा. ऑनलाईन प्रसिध्दी करीत असताना ती राज्य स्तरावरील संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल किंवा क्षेत्रीय स्तरावर प्रसिध्द करण्यात येईल याबाबतचा निर्णय त्या त्या विभागातर्फे घेण्यात यावा व सामान्य प्रशासन विभागाला कळविण्यात यावे. यासाठी सामान्य प्रशासन विभागाने व इतर सर्व विभागांनी संकेतस्थळ यूजर फ्रेंडली करण्यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. |
| प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशाबाबत : | बऱ्याचदा प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशांचे पालन जन माहिती अधिकारी यांचेकडून होत नसल्याबाबत निदर्शनास आले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी या संदर्भात योग्य ती दक्षता घेण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाने सूचना निर्गमित कराव्यात. |
| माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत शासनाने केलेली कार्यवाहीची प्रसिध्दी : | शासन स्तरावरील परिपत्रक, आदेश, निर्णय, सूचना किंवा एखाद्या विषयावर कार्यवाही होते त्या संबंधीची संपूर्ण नस्ती ऑनलाईन प्रसिध्द करण्यात येईल या संदर्भात तपासणी करुन योग्य ती कार्यवाही करणे. |
| माहितीचा अधिकार अधिनियम अंमलबजावणी करिता समन्वयक नेमणेबाबत : | नागरिकांतर्फे किंवा माहिती अधिकार अर्जदारातर्फे वारंवार ज्या विषयासंबंधीच्या माहितीची विचारणा किंवा मागणी होते त्या विषया संदर्भातील सारसंग्रह तयार करुन ते अद्ययावत करण्यात यावेत व प्रसिध्द करावेत. याबाबत सर्व विभागांना व त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयाना सूचना द्याव्यात व त्याच्या अंमलबजावणीसाठी खाते निहाय समन्वयक (नोडल ऑफीसर) नेमण्यात यावेत. जिल्हास्तरीय किंवा विभागीय स्तरावर एकच समन्वयकाऐवजी (नोडल ऑफीसर) ऐवजी प्रत्येक जिल्हा विभागीय स्तरावर वेगवेगळे समन्वयक (नोडल ऑफीसर) त्या त्या विभागांनी नेमावेत. त्यांनी त्यांच्या भूमिका व जबाबदारी निश्चित करावी. |
| माहितीचा अधिकार अधिनियम कलम ४ अंमलबजावणीसाठी आराखडा निश्चित करणे : | माहितीचा अधिकार अधिनियम कलम ४ च्या अंमलबजावणीसाठी शासनातर्फे राज्य माहिती आयोगास अहवाल पाठविणे व त्रैमासिक अहवाल पाठवून त्यासंदर्भात त्रयस्थ पक्षाकडून तपासणी करण्याचा आराखडा निश्चित करुन योग्य ते आदेश शासनस्तरावर काढणे व राज्य माहिती आयोगास सादर करणे. |